# सामान्य प्रशासन विभाग जिल्हा परिषद धाराशिव

Email-dyceo.gaddharashiv@gmail.com Tel- 02472-223388


जा.क/जिपधा/साप्रवि/ने-4/अंकपा/ 1933/2025 दिनांक-24 /09/2025

## अनुकंपा पदभरती सन- 2025
## नियुक्तीने पदस्थापना समुपदेशन प्रकिया दि.26/09/2025 बाबत

जिल्हा परिषद धाराशिव मार्फत अनुकंपा पदभरती सन 2025 ची प्रक्रिया सुरु असून अनुकंपा पदभरती प्रतिक्षासुची यादीवर एकूण 1 ते 157 इतके उमेदवार आहेत. त्यानुषंगाने दिनांक-03/09/2025, दि. 04/09/2025 तसेच दिनांक-08/09/2025 रोजी जिल्हा परिषद स्थायी समिती सभागृह, धाराशिव तसेच तदनंतर सामान्य प्रशासन विभाग जि.प.धाराशिव येथे वेळोवेळी अपूर्ण कागदपत्र पूर्ण करणे तसेच मुळ शैक्षणिक कागदपत्र पडताळणीसाठी कॅम्पचे आयोजन करण्यात आलेले होते.

त्याप्रमाणे वेळोवेळी आयोजित करण्यात आलेल्या कॅम्पमध्ये तसेच तदनंतर प्रत्यक्ष कार्यालयात उपस्थित राहून ज्या उमेदवारांनी त्यांचे अनुकंपा नियुक्तीचे अनुषंगाने त्यांचे प्रस्ताव परिपूर्ण केलेले आहेत, अशा उमेदवारांना अनुकंपा पदभरती सन-2025 अंतर्गत नियुक्तीने पदस्थापना देण्यात येणार आहेत.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई शासन निर्णय दि. 17 जुलै, 2025 तसेच महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, मुंबई, शासन निर्णय दि. 31 जुलै, 2025 मधील मार्गदर्शक सुचनानुसार जिल्हा परिषदेकडील प्रतिक्षासुचीवर असलेल्या अ.क्र.1 ते 157 उमेदवारापैकी ज्या उमेदवारांचे प्रस्ताव परिपूर्ण असून जे उमेदवार अनुकंपा नियुक्तीस पात्र आहेत, अशा उमेदवारांना उपरोक्त शासन निर्णयातील निर्देशाप्रमाणे गट-क( वर्ग-3) व गट-ड (वर्ग-4) वरील पदावर नियुक्तीने पदस्थापना देण्यात येणार आहेत.

जिल्हा परिषद, धाराशिव कडील अनुकंपा प्रतिक्षासुचीवरील अ.क्र. 1 ते 157 उमेदवारापैकी ज्या उमेदवारांचे प्रस्ताव पूर्ण, अपूर्ण आहेत तसेच जे उमेदवार नियुक्तीस अपात्र आहेत, अशा उमेदवारांची यादी जिल्हा परिषद धाराशिवच्या https://zpdharashiv.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर दि. 25/09/2025 रोजी प्रसिध्द करण्यात येणार आहे.

अनुकंपा पदभरती सन 2025 चे अनुषंगाने प्रस्ताव पूर्ण असलेल्या उमेदवारांकडून त्यांची शैक्षणिक पात्रता विचारात घेता त्यांना गट-क (वर्ग-3) व गट-ड (वर्ग-4) या पदावर पदस्थापना देणेपूर्वी शैक्षणिक पात्रतेप्रमाणे विविध पदासाठी दि. 15/09/2025 रोजी पसंतीक्रम सादर करणेसाठी जाहिर प्रगटन देवून कळविण्यात आलेले होते. त्याप्रमाणे पसंतीक्रम सादर केलेल्या व प्रस्ताव पूर्ण असलेल्या उमेदवारांना त्यांची शैक्षणिक पात्रता विचारात घेता महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम 1967 नुसार ज्या पदासाठी पात्र ठरतात त्या पदाची सद्यस्थितीतील प्रवर्गनिहाय रिक्तता, अनुकंपा भरतीअंतर्गत 20% प्रमाणे येणारी संख्या विचारात घेता त्यांना नियुक्तीने पदस्थापना देण्यासाठी दिनांक 26/09/2025 रोजी सकाळी 11.00 वाजता स्थायी समिती सभागृह, जिल्हा परिषद, धराशिव येथे समुपदेशन प्रक्रिया आयोजित करण्यात आलेली आहे.

करीता अ.क्र.1 ते 157 वरील ज्या उमेदवारांचे प्रस्ताव पूर्ण आहेत, अशा अनुकंपाधारक उमेदवारांनी समुपदेशनाकरीता दिनांक- 26/09/2025 रोजी सकाळी 11.00 वाजता स्थायी समिती सभागृह, जिल्हा परिषद, धराशिव येथे वेळेवर उपस्थित राहावे. संबधित उमेदवार वेळेवर उपस्थित न राहिल्यास प्रशासनाचे सोईचे ठिकाणी पदस्थापना देण्यात येईल, याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**(तुकाराम भालके)**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा)**
**जिल्हा परिषद धाराशिव**